सं फौ.ख..क्र. १०५९/२०२३
शासन विरुध्द गणेश
निशाणी क्र. १२ खाली

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.५ यांची साक्ष**

मी देवाची शपथ खरे सांगते की,
माझे नाव – विलास वसंत गायकवाड,
वय – ५२ वर्षे, कामधंदा - बाजार समिती वाई येथे शिपाई,
राहणार – पाचवड, ता.वाई, जि. सातारा.

**सरतपासणी सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती सुळ -**

मी सन २०१४ पासुन कृषी उत्पन्न बाजार समिती वाई येथे शिपाई पदावर कार्यरत आहे. माझी डयुटी कधी रात्रपाळीत तर कधी दिवसा असते. दि. ०३/०५/२०२३ रोजी मी रात्रपाळीत बाजार समितीत डयुटीवर होतो. मी रात्रीला आमच्या मार्केट यार्डला राउंड मारला, त्यावेळी मला सर्व व्यवस्थीत दिसले. दुस-या दिवशी सकाळी ७.०० वाजता मार्केट यार्डमध्ये मी राउंड मारत असताना मला तेथे लोकांची गर्दी दिसली. तसेच तेथे तारा तोडल्याचे दिसले, व हॉटेल चालु दिसले. ते हॉटेल पत्रा शेडचे होते. सदरची बाब मी आमच्या बाजार समितीचे लिपीक चेतन पिसाळ यांना कळविली. त्यानंतर त्यांनी सचिव राजेंद्र क्षिरसागर यांना फोन करुन घटनेची माहिती दिली. त्यानंतर ते सर्वजण त्या ठिकाणी जमले. त्यावेळी राजेंद्र क्षिरसागर यांनी गणेश सावंत नामक व्यक्तीला फोन करुन तेथे बोलाविले होते. त्याप्रमाणे गणेश सावंत तेथे आले. त्यांच्यात व बाजार समितीचे सचिव आणि लिपीक यांच्यात चर्चा झाली. त्यावेळी गणेश सावंत यांनी तारा परत जोडून देण्याचे मान्य केले होते. श्री. क्षीरसागर यांनी घटनेची फिर्याद दिली होती. पोलीसांना माझा जबाब नोंदविला होता. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. तो आज न्यायालयात हजर नाही. (साक्षीदाराने यावेळी न्यायालयात हजर असलेल्या आरोपीस ओळखलेले नाही.)

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस.डी. खामकर -**

२. मी कृषी उत्पन्न बाजार समिती वाई येथे कायमस्वरुपी शिपाई पदावर कार्यरत

असण्याचे दर्शविण्याकरीता कोणतेही कागदपत्र पोलीसांनी तपासादरम्यान हस्तगत केले नव्हते. माझी रात्रपाळीतील डयुटी कायमस्वरुपी नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, बाजार समितीचे मुख्य चेक पोस्ट मुख्य रस्त्याला लागुन आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या चेक पोस्ट वर बाजार समितीत कुणी प्रवेश केला व कोण बाहेर गेले याबाबतचा तपशील ठेवण्यात येतो. हे म्हणणे खरे आहे की, बाजार समितीत प्रवेश व्दारावर सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, बाजार समितीतील साहित्य व परिसर यांच्या सुरक्षिततेसाठी रात्रपाळीत पोलीस कर्मचारी नियुक्त असतो. मी कथीत घटनेच्यावेळी रात्रपाळीत कधी बाजार समितीत आलो व कधी परत गेलो याबाबतचा तपशील लेखी स्वरुपात उपलब्ध आहे. कथीत घटनेच्यावेळी मी रात्रपाळीत राउंड मारले याबाबत कोणतेही कागदपत्रे पोलीसांनी माझ्याकडून हस्तगत केली नव्हती. त्याचप्रमाणे सकाळी सुध्दा मी कथीतरित्या राउंड घेतला याबाबतचे कागदपत्रे देखील पोलीसांनी माझ्याकडून हस्तगत केले नव्हते.

**३.** हे म्हणणे खरे आहे की, बाजार समितीतील गाळे हे संबंधीत खरेदीदार यांना लिलाव पध्दतीने दिले जातात. हे म्हणणे खरे आहे की, बाजार समितीच्या आतमध्ये तरटे यांचे चहाचे दुकान आहे. आता मला दस्त यादी निशाणी क्र.३० लगत दाखल असलेले फोटो दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, सदरील फोटोंमधील दुकाने बाजार समितीच्या आतील आहेत व ती सर्व पत्रा शेड मधील आहेत. सदरील पत्रयाची दुकाने शेतक-यांची नसुन ती ति-हाईत इसमांची असल्याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, बाजार समितीचा गट क्रमांक, तसेच क्षेत्र यांचा तपशील मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, जिल्हाधीका-यांनी मजूर केलेला नकाशा मी पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे बाजार समितीच्या हददीची माहिती मला नाही.

**४.** मी स्वतः पोलीसांकडे कधीही गेलो नव्हतो. श्री. क्षीरसागर हे आमचे साहेब आहेत व त्यांचे निर्देश मला ऐकावे लागतात. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी सांगीतल्यानुसार मी आज रोजी साक्ष देत आहे. सन २०२३ मध्ये मी मोबाईल फोन वापरायचो माझ्या मोबाईल क्रमांकाचे शेवटचे अंक ८३८६ असे अाहेत. त्या फोनवरुन माझे कुणाशीही कथीत घटनेबाबत संभाषण झालेले नाही. मी प्रत्यक्ष पोलीसांकडे कधीही गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे

नाही की, मी रात्रीला आमच्या मार्केट यार्डला राउंड मारल्याचे त्यावेळी मला सर्व व्यवस्थीत दिसल्याचे, दुस-या दिवशी सकाळी ७.०० वाजता मार्केट यार्डमध्ये मी राउंड मारत असताना मला तेथे लोकांची गर्दी दिसल्याचे तसेच तेथे तारा तोडल्याचे दिसले, व पत्राशेडमध्ये हॉटेल चालु दिसल्याचे मी खोटे सांगत आहे. हे महणणे खरे नाही की, सचिव व लिपक यांच्यात व गणेश सावंत नामक व्यक्तीमध्ये चर्चा झाल्याचे व त्यावेळी गणेश सावंत यांनी तारा परत जोडून देण्याचे मान्य केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

समक्ष व श्रवणोत्तर स्वीक्रुत

दि. २०/०३/२०२६

(आर.एम. भेंडे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वाई.